| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे<br>विभागीय मंडळ, पुणे.४११००५<br>MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &<br>HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005 | |
| DIVISIONAL CHAIRMAN<br>25536722 (OFFICE) | DIVISIONAL SECRETARY<br>25536781/82/83, 25536712 (OFFICE) | E-MAIL -<br>sscboardpune@gmail.com |


क्रमांक /पुविमं/शाखा डी.पी./ 1041
पुणे. ४११००५
दि. 09/02/2026

प्रति,
सर्व परिरक्षक (Custodian)
इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा फेब्रु-मार्च २०२६
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

**विषय :- इ. १० वी व इ. १२ वी फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या उत्तरपत्रिका प्रचलित पध्दतीप्रमाणे पोस्ट ऑफिस कार्यालयात जमा करणेबाबत...**
**संदर्भ :- क्र.रा.मं/परीक्षा-२/४६८ दि. ०३.०२.२०२६ रोजीचे राज्य मंडळाचे पत्र**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्य मंडळाच्या संदर्भिय पत्रानूसार इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उत्तरपत्रिका थेट संबंधित परिरक्षक (Custody) पोस्ट ऑफिस मार्फत संकलित करण्यात येतील याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि मंडळावरील आर्थिक भार व काही तांत्रिक समस्या लक्षात घेता सदर प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेच्या उत्तरपत्रिका परिरक्षक (Custodian) यांनी प्रचलित पध्दतीप्रमाणेच पोस्ट ऑफिस कार्यालयामध्ये जमा करावयाच्या आहेत.

इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या सकाळ सत्रातील उत्तरपत्रिका त्याच दिवशी पोस्ट ऑफिस कार्यालयामध्ये जमा करावयाच्या आहेत. व दुपार सत्रातील उत्तरपत्रिका त्याच दिवशी सायंकाळी पोस्ट ऑफिसमध्ये पाठविण्यात याव्यात. अपवादात्मक परिस्थितीत दुसऱ्या सत्रातील उत्तरपत्रिका दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर पोस्ट ऑफिसमध्ये जमा होतील याची दक्षता परिरक्षक यांनी घ्यावी.

MBRaut
9.2.26
(डॉ. मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे. ४११००५

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव
मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे - ४११००४